Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- XII ISSUE- I JANUARY 2025 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.379 ISSN 2349-638x

# संत साहित्यातील निसर्ग वर्णन

**प्रा. डॉ. कोतमे धिरजकुमार सत्येकाल**
मराठी विभाग प्रमुख,
जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय,लातूर
dhiraj.kotme24@gmail.com

महाराष्ट्राला संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, समर्थ रामदास व संत प्रभावळीची थोर परंपरा लाभलेली आहे, म्हणूनच महाराष्ट्राला संतांची भूमी असे म्हटले आहे. संतांच्या कार्यामुळेच महाराष्ट्राचा आध्यात्मिक, सांस्कृतिक, सामाजिक विकास झालेला आपल्याला दिसून येतो. संतांनी आपल्या वाणीने, लेखनाने आणि कृतीने समाजाला भावनिक, नैतिक आणि मानसिक आधार देऊन आत्मउन्नतीसाठी नामस्मरणाचा, भक्तिमार्ग दाखवून त्यांचा उद्धार घडवून आलेला आहे.

आपली संस्कृती ही निसर्गाचा सन्मान करणारी व त्याची पूजा करणारी आहे. त्यामुळेच आपल्याकडे निसर्गातील होणाऱ्या ऋतूबदलानुसार अनेक सण, वार, उत्सव, महोत्सव साजरे होतात. याबरोबरच कला, साहित्य, धर्म, विज्ञान, अध्यात्म इत्यादी सर्वच घटकांना निसर्गाने व्यापलेले आहे. निसर्गाचा आणि मानवी जीवनाचा अतिशय जवळचा संबंध आहे. त्यामुळे त्याचाच मोठ्या प्रमाणात प्रभाव संतांच्या लेखनावर पडलेला दिसून येतो. संतांनी संसार त्यागाला विरोध करून संसारात राहूनच नित्य नामस्मरण, भक्ती करून मोक्ष प्राप्तीचा मार्ग दाखवलेला आहे. लोकांना उपदेश करताना संतांनी तत्कालीन समाज जीवनातील, आजूबाजूच्या परिसरातील निसर्ग, पशु, पक्षी, कीटक, वनस्पती इत्यादींचे उदाहरण दिलेले आहे.

संत साहित्यामध्ये निसर्गाचे भरभरून वर्णन करण्यात आलेले आहे. संतांनी निसर्गाच्या विविध पैलूंचे वर्णन केलेले आहे. ज्यामध्ये निसर्गाची सुंदरता, त्याची शक्ती आणि त्याचे महत्त्व यांचे वर्णन केलेले आहे. संतांनी निसर्गाचे वर्णन करताना त्याच्याशी जोडलेल्या भावना आणि निसर्गाकडून मिळणाऱ्या शिकवणीचा दाखला दिलेला आहे. निसर्गातील फुले, फळे, पाने, पशु, पक्षी, झाडे, नदी, डोंगर, दरी, पर्वत, पाऊस, चंद्र, सूर्य, तारे, सरोवर इत्यादीचे वर्णन संतांनी साहित्यातून केलेले आहे. संतांच्या मते निसर्ग हा ईश्वराचा अवतार आहे. संतांना निसर्गामध्ये ईश्वराचा सहवास अनुभवता येतो. संतांनी निसर्ग वर्णनात निसर्गाच्या सौंदर्याचे, शक्तीचे आणि निसर्गाचे महत्त्व सांगितलेले आहे. संतांनी निसर्गाच्या अंगभूत शक्तीचे वर्णन केलेले आहे. संतांनी वाऱ्याची शक्ती, पाण्याची शक्ती, उष्णतेची तीव्रता, पाऊस, थंडी इत्यादी शक्तीचे वर्णन केलेले आहे. निसर्ग हा जीवनाचा आधार आहे. निसर्ग हा मानवी जीवनाचा महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे संतांनी निसर्गाच्या संरक्षणाच्या आवश्यकतेचे वर्णन केलेले आहे. त्याबरोबरच संतांनी निसर्गाच्या प्रेमातून आध्यात्मिक अनुभूतीचे वर्णन केलेले आहे. संतांनी निसर्गाची सुंदरता, त्याची शक्ती आणि त्याचे महत्त्व यांचे वर्णन केले आहे. संतांनी निसर्गाचे वर्णन करताना त्यांच्याशी जोडलेल्या भावना आणि त्यांच्याकडून मिळणाऱ्या शिकवणीचा उल्लेख केलेला आहे.

संत ज्ञानेश्वरांनी भावार्थदीपिकेत निसर्गाचे वर्णन केलेले आहे. आणि त्याचे महत्त्वही पटवून दिलेले आहे. निसर्ग हा ईश्वराचा स्वरूप आहे आणि त्यांचे संरक्षण करणे हे महत्त्वाचे कर्तव्य आहे. संत ज्ञानेश्वरांनी एका ओवीत कपोत म्हणजे पारव्याचे मनमोहक असे वर्णन केलेले आहे. संत ज्ञानेश्वरांनी निसर्ग वर्णन करणाऱ्या ओव्या ज्ञानेश्वरीत रचलेल्या आहेत. कासवीनीच्या दृष्टांतात त्यांनी सांगितले आहे की कासवीण किनाऱ्यावर मातीत अंडी घालते. त्यानंतर उन्हामुळे रेती गरम होऊन अंडी उबवतात व पिले बाहेर येतात. त्यानंतर ही पिले स्वतंत्रपणे जगतात आणि वाढतात, कासविण त्यांना प्रत्यक्ष पिलांचे पोषण करत नाही. आत्मसंगती जडाला चेतन दशा कशी आणते हे त्यांनी या दाखल्यातून सांगितले आहे.

VOL- XII ISSUE- I JANUARY 2025 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.379 ISSN 2349-638x

बांबूला फुलोरा येण्यासाठी अनेक वर्ष वाट पहावी लागते. त्यानंतर त्याला एकदाच फुलोरा येतो. त्यानंतर बांबूला फुलोरा येत नाही. यामधून संत ज्ञानेश्वरांनी आपल्याला निष्काम कर्मयोगाची महती सांगितली आहे की फळाची अपेक्षा न करता जी कार्य केली जातात ती पुढे वाढत नाहीत हे स्पष्ट करताना त्यांनी बांबूच्या फुलोऱ्याचा दृष्टांत सांगितलेला आहे.

वारूळ हा निसर्गातील महत्त्वाचा घटक आहे हजारो विविध रंगांनी, लहान लहान अळंबींनी ते वारूळ भरून गेलेले असते.

*'का आकाशी गंधर्व नगर। भूतळी पिपी लिका बांधे घर।*

या ओवीतून संत ज्ञानेश्वरांनी वारुळाची आकाशातील गंधर्व नगराची तुलना केली आहे आणि

*"नाना मेरुवारी सपूर। परमाणु बैसले।।*

या ओवीतून वीरू पर्वतावर लहान लहान परमाणू बसावेत तशा रीतीने वारुळातील मुंग्यांचे घर दिसत असल्याचे सांगितले आहे.

संत ज्ञानेश्वरांनी पावसाळ्याच्या सुरुवातीला सरड्याच्या धावपळीचे वर्णन केलेले आहे. हा काळ सरड्यांच्या विणीचा काळ सुरू होतो तेव्हा नर सरडे इकडून तिकडे धावपळ करीत नर मादीला आकर्षित करण्यासाठी खडकाच्या टोकावर झाडांच्या शेंड्यावर चढून गळा फुगवून दिखावा करतात. ही अवस्था संत ज्ञानेश्वरांनी,' का मातलिया सरडा' या ओवीत मांडलेली आहेत. संत ज्ञानेश्वरांनी अनेक वैशिष्ट्यप्रकारे मांडलेली आहेत.

*वसंत तेथे वने। वन तेथे सुमने। सुमनी पालिंगने*
*सारंगाची। गुरु तेथे ज्ञान। ज्ञानी आत्मदर्शन।*

दर्शनी समाधान आर्थि जैसे, या ओवीतून संत ज्ञानेश्वरांनी निसर्गा विषयी संवेदना सांगितलेल्या आहेत. वसंत ऋतूमध्ये झाडांना पालवी फुटते, पाने ,फुले येतात. त्यामुळेच तेथे भ्रमरांचे आगमन होते. त्याप्रमाणे ज्ञानी गुरूंच्या सहवासात ज्ञान घेण्यासाठी आलेल्या माणसांना गुरूच्या मार्गदर्शनाने व सहवासामुळे आत्मज्ञान प्राप्त होते. या ओवी मधून संत ज्ञानेश्वर यांनी झाडाला ज्ञानी व्यक्तीची उपमा दिलेली आहे.

संत ज्ञानेश्वरांनी वृक्षाकडून भेदभाव न घेण्याचा दाखला दिलेला आहे. ते सांगतात की वृक्ष हे झाडाला पाणी घालणारे व झाडावर कुऱ्हाड चालवणारे या दोन्ही व्यक्तींना समान सावली देतात. ते कोणताही भेदभाव करत नाही. हे निसर्गातून समानता त्यांनी दाखवून दिली आहे. याप्रकारे संत ज्ञानेश्वरांनी निसर्गातील पशु, पक्षी, वृक्ष, झाडे, पाने, फुले, धान्य इत्यादीचे मोठ्या प्रमाणात वर्णन केलेले आहे. संत ज्ञानेश्वरांना पक्षांमधील कावळा हा शुभ पक्षी वाटतो. जो पाहुण्याच्या आगमनाचा संदेश देतो. कावळा बरोबरच त्यांनी चातक, मोर या पक्षांचा उल्लेख त्यांनी अभंगातून केलेला आहे. चातक पक्षाची तहान भागवण्यासाठी मेघ बरसतो त्यामुळे सर्वच जगाची तहान भागली जाते. पावसामुळे समृद्धी होते. त्यामुळे पाने, फुले, फळे, धन्य याची सुबकता होते. अशाप्रकारे संत ज्ञानेश्वराच्या ओव्यामध्ये निसर्गाचे वर्णन मोठ्या प्रमाणात आलेले आहे.

संत एकनाथांनी निसर्गाच्या परोपकारी वृत्तीचे भरभरून वर्णन आपल्या अभंगातून केलेले आहे. पर्वत स्वतःच्या उदरात असलेल्या रत्नांच्या खाणी सर्वांना देतात. पर्वतावर वाढणारी झाडे, गवत, पडणारे पाणी सर्वांनाच देतात. निसर्ग लोकांसाठी त्यांच्या विकासासाठी भरभरून देतात हे निसर्गाचे मानवावर असलेले अनंत उपकार असल्याचे संत एकनाथ आपल्या अभंगातून सांगतात. 'श्री एकनाथी भागवत' या ग्रंथात संत एकनाथांनी सांगितले आहे की बी जर चांगले असेल, तर फळ उत्तम येते. त्याचबरोबर पाण्याची तुलना कोणाशीही करता येत नाही. त्यामध्ये सर्व रस एकरूप होतात. इतर रस क्षणिक आनंद देतात.पण पाणी माणसाचे जीवन वाचवू शकते हे निसर्गाचे योगदान सांगितले आहे. निसर्गा विषयी उपकाराची जाणीव ठेवून कृतज्ञता व्यक्त करावी हा विचार संत एकनाथांनी आपल्या लेखनातून व्यक्त केलेला आहे. पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश या पंचमहाभूताविषयीची संत एकनाथांच्या ग्रंथात संदर्भ आलेले आहेत. निसर्गाकडून समानता हा गुण आपणास दिसतो. इतरांना सामावून घेण्याची वृत्ती आपल्याला निसर्गाकडून कळते. ही वृत्ती माणसाने निसर्गाकडून घेण्याची गरज आहे. माणसांनी निसर्गा विषयी उपकाराची जाणीव ठेवून कृतज्ञता व्यक्त करावी हा विचार संत एकनाथांनी आपल्या साहित्यातून दिलेला आहे.

संत सावता माळी यांनी आपल्या अभंगातून

*'कांदा मुळा भाजी। अवघी विठाबाई माझी।*
*लसूण मिरची कोथिंबिरी। अवघा झाला माझा हरी'।*

या अभंगातून निसर्ग हा परमेश्वर आहे. शेतातील पिकातून अन्नधान्यातून विठ्ठलाला शोधताना त्यांना निसर्ग

विठ्ठलाची अनुभूती देतो असा विचार या अभंगातून सावता माळी यांनी सांगितला आहे.

*'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे'*

हा पर्यावरण विषयक आपली भावना सांगणारा संत तुकारामांचा अभंग अतिशय लोकप्रिय आहे. वृक्ष, पशु, पक्षी हे निसर्गातील घटक खूप फायद्याचे आहेत. म्हणून संत तुकोबांनी त्यांना सगे सोयरे म्हटले आहे. संत तुकोबांना त्यांच्यासोबत चा एकांत अधिक प्रिय आहे त्यांनी आकाशाला मंडप आणि पृथ्वीला आसन मानलेले आहे. निसर्गाच्या सानिध्यातच तुकोबाचे मन रमते. यातूनच त्यांची निसर्गा विषयीची संवेदना आणि पर्यावरण विषयाची जाणीव व्यक्त होते. भारतीय संस्कृतीमध्ये पंचमहाभूतांना परमेश्वर मानले जाते. हे संत साहित्यातून दिसून येते.

निसर्गाच्या सानिध्यात लोकांपासून वेगळे एकांतात निसर्गाच्या सानिध्यात माणसाचे मन शांत होते. त्यामुळे माणसाला एकांत मिळतो. स्वतःचा शोध लागतो. आजच्या घाई गडबडीच्या काळात आपण स्वतःसाठी वेळ देऊ शकत नाही. त्यामुळे आत्मिक आनंद मिळत नाही. त्यामुळे मानसिक ताण तणाव वाढतो. आजच्या काळात अशा अडचणी मोठ्या प्रमाणात निर्माण झालेल्या दिसतात. मनाचे समाधान, आत्मिक आनंद आपणास निसर्गाच्या सानिध्यातच मिळतो हे आपल्याला संतांच्या साहित्यातून दिसते. संत तुकोबांची प्रतिभा ही भंडारा व थामा डोंगराच्या सानिध्यातच खुललेली आहे. निसर्गाच्या सानिध्यातील सर्वच घटक त्यांना सोयरे वाटायला लागले. संत तुकोबांनी आपले विचार सांगण्यासाठी निसर्गातील विविध प्रतिमा, उपमा व संदर्भाचा वापर केलेला आहे. सुख पाहता जीवापाडे, दुःख पर्वताएवढे असे ते सहज म्हणून जातात. विविध अशा सुंदर कल्पनेतून तुकोबांनी भक्तिभावाने जीवनसत्त्याचे दर्शन घडविलेले आहे.

समर्थ रामदासांनाही निसर्गाची चांगली ओढ होती. त्यांनी संपूर्ण भारतभर तीर्थयात्रा केली होती. त्यांच्या जीवनातील मोठा काळ त्यांनी हेळवाक, शिवथर अशा सह्याद्रीच्या दुर्गम भागात घालवलेला आहे. दास डोंगरी राहतो असे त्यांनी स्वतःचे वर्णन केलेले दिसून येते. समर्थांना निसर्गातील पशु, पक्षी, वृक्ष, वेली, कीटक यांची ओळख असल्याचे दिसून येते. समर्थांनी नदीच्या काठी सरकारी बागेत कोणकोणती झाडे असावी याचे वर्णन बाग प्रकरणात केली सांगितले आहे. समर्थांनी तीनशे वनस्पतीची नावे सहजपणे घेतलेली आहेत. समर्थांच्या करुणाष्टकात अनेक पशु पक्षांचा उल्लेख केलेला दिसून येतो. समर्थ रामदासांनी दासबोधामध्ये पंचमहाभूतांचे स्तवन आणि निरूपण स्वतंत्रपणे केलेले आहे. यामध्ये त्यांनी सूर्य, वायु, वसुंधरा, पाणी यांचे स्तवन केलेले आहे.

संताच्या निसर्ग वर्णनाची जाणीव आपणास संत साहित्यात पावलोपावली जाणवते. सर्वच संतांना निसर्गाच्या सानिध्यात भक्तीची ओढ दिसून येते. संत साहित्यातून व्यक्त होणारी गोष्ट म्हणजे जगा आणि जगू द्या हा विचार आजच्या परिस्थितीत अतिशय उपयुक्त आहे. यातूनच पर्यावरण प्रबोधनाचा विचार संत साहित्यातून व्यक्त होताना दिसून येतो.

आज मानव आपल्या स्वार्थासाठी निसर्गाचा ऱ्हास करताना दिसतो. भरमसाठ वृक्षतोड, पाण्याची नासाडी, प्रदूषण यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडत चालले आहे. संतांनी पर्यावरण विषयक विचारांना चांगले स्थान दिलेले आहे. त्यांनी निसर्गाचे संरक्षण आणि संवर्धन याविषयी सुंदर विचार मांडलेले आहेत. मानवी जीवनाच्या कल्याणासाठी आजच्या काळात संतांच्या निसर्ग विचाराची अतिशय गरज असल्याचे दिसून येते.

**संदर्भः-**

1. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास-ल. रा.नसिराबादकर
2. संत पंत व तंत - श्री. म. माटे
3. मध्ययुगीन मराठी वान्मयाचा इतिहास-पिंपळवाडकर
4. संत साहित्यातील निसर्गप्रेम- डॉ. अशोक लिंबेकर
5. संत साहित्यातील निसर्ग संवेदन-डॉ.कविता मुरूमकर
6. मराठी संत साहित्यातील निसर्ग-डॉ. उमेश करंबेळकर